**प्रेसनोट** **दि.०६/०७/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**घरच्यांशी रागावून घर सोडून निघून आलेल्या मुलगीस समुपदेशन करुन दिले पाल्यांचे ताब्यात**

एक मुलगी वय १९, रा. कटफळ, बारामती, पुणे ही आई वडीलांशी वाद विवाद करुन व रागावून घर सोडून पुणे येथे आली होती व सदर मुलगी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीमध्ये असलेबाबत बारामती पोलीस ठाणे येथून वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव भोसले, मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे यांना माहिती मिळाल्याने त्यांनी ठाणे प्रभारी अधिकारी कर्तव्यावर असलेले पोलीस उप निरीक्षक, धिरज कांबळे यांना सदर मुलीचा शोध घेणेकामी व ती पिंगळे वस्ती येथे असल्याबाबत माहिती दिली असता, पोलीस उप निरीक्षक, धिरज कांबळे, मपोहवा भारती होले, मपाना नांगरे, पो.शि. जमदाडे यांनी पिंगळे वस्ती, मुंढवा भागामध्ये सदर मुलीचा कसुन शोध घेतला असता सदर मुलगी पिंगळे वस्ती, मुंढवा येथे मिळून आल्याने व तिचेकडे चौकशी करता ती नोकरी शोधणेसाठी येथे आल्याची माहिती दिली असता, तिस पोलीस ठाणे येथे आणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपतराव भोसले, मपोहवा भारती होले, मपोशि नांगरे यांनी तिचे समुपदेशन केले व त्यादरम्यान पोलीस उप निरीक्षक, धिरज कांबळे यांनी बारामती पोलीस ठाणे येथे संपर्क साधून व तिचे नातेवाईकांची माहिती घेवून त्यांना मुलगी मुंढवा पोलीस ठाणे येथे सुखरुप असल्याची माहिती दिल्याने मुलीचे मामा प्रकाश जगन्नाथ खंडाळे, वय ३० रा. म्हसोबाची वाडी, ता इंदापूर, जि. पुणे हे मुंढवा पोलीस ठाणे येथे आले असता, त्याची खात्री करुन सदर मुलीस त्याचे ताब्यात दिले तेव्हा सदर मुलीने तिला दिलेल्या वागणुकीबाबत व केलेल्या मार्गदर्शनाबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव भोसले, पोउपनि धिरज कांबळे, मपोहवा भारती होले, नांगरे यांचे आभार मानले.

तरी नमूद पोलीस अधिकारी व पदाधिकारी यांनी केलेल्या चागल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**दि.०६/०७/२०१९**

**(एस.एस. शिंदे)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**